# देगलूर महाविद्यालयात लसीकरण शिबिर

देगलूर : देगलूर महाविद्यालय देगलुरमध्ये राष्ट्रीय छात्र सेना व उपजिल्हा रुग्णालय, नागरीक प्राथमिक आरोग्य केंद्र, देगलूर यांच्या संयुक्त विद्यमाने कोविड- १९ बूस्टर लसीकरण शिबिर महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासाठी आयोजित करण्यात आले होते. या बुस्टर लसीकरण शिबिराचे उद्‌घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे श्री.राम दाचावार व आरोग्य कर्मचारी बस्वराज शेटकार, वजीरे रामेश्वर आणि महिला कर्मचारी शिरगिरे, पाटील, वरटी, शिवणे, कमलीकर, सोनकांबळे यांचे सहकार्य लाभले आणि या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य अनिल चिद्रावार, उप प्राचार्य गोविंदवार निवृत्ती तर एनसीसीचे प्रमुख लेफ्ट.डॉ. नीरजकुमार उपलंचवार यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. येरावार संतोष यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा.डॉ.नरवाडे भानुदास यांनी मानले.